प्रसिद्धी : दरमहा १५ तारखेस    दि यशवंत बँक फलटणचे मुखपत्र    RNI No. MAHMAR/2010/31891

# यशवंत इन हाऊस
YASHWANT IN HOUSE

• फलटण जि. सातारा. • वर्ष १२ वे • अंकः १ ला • जानेवारी २०२२ • पृष्ठ १६ • किंमत : रूपये ५/-

## सर्व भारतवासियांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!






## मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा....

आपली बँक, दि यशवंत बँक...!

अंतरंग

| १) मुखपृष्ठ | २) कोरोना जागृती | ३) मनाचे श्लोक | ४) दिनविशेष | ५) लॉकर संबंधी | ६) वन टाईम सेटलमेंट | ७/८) पी.पी.एफ
| ९) हिंदू अविभक्त कुटुंब | १०) कथा | ११) गणपती स्त्रोत्र | १२) भावपूर्ण श्रध्दांजली | १३) क्षणचित्रे | १४) ठेव योजना
| १५) बँक वैशिष्ट्ये | १६) कर्ज योजना



# न घाबरता.. जागरूक राहुया.. सामना करुया..!

## ओमीक्रॉन आणि कोरोना व्हायरस

### नॉव्हेल करोना विषाणूने होणाऱ्या कोविड-19 या आजाराची महत्त्वाची लक्षणे :



1. सर्दी, ताप, डोकेदुखी



2. कोरडा खोकला घसा तीव्र दुखणे



3. श्वास घ्यायला त्रास होणे

### आपण करोना विषाणू बाधित व्यक्तीच्या संपर्कात आलो आहे असा संशय असल्यास खालील गोष्टींचा अवलंब करावा :



वारंवार आपले हात साबण व पाणी वापरुन स्वच्छ धुवा.



शिंकताना व खोकताना नाकावर व तोंडावर रुमाल धरा.




ज्या व्यक्तींमध्ये सर्दी, ताप, डोकेदुखी, कोरडा खाकला, घसा तीव्र दुखणे, श्वसनाचा त्रास अशी लक्षणे दिसत असतील त्यांच्या पासून किमान 3 फूट दूर रहा.



विषाणू बाधीत संशयितांनी पुढील 14 दिवसांसाठी सर्व लोकांशी संपर्क टाळा व वेगळ्या खोलीत रहा.



मास्कचा वापर करा.



कुठेही गर्दी करु नका.

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी.**

- कोरोना विषाणू संसर्ग झाल्याची शंका आली तरी घाबरु नका. त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- कोरोना विषाणूची बाधा झालेला रुग्ण पूर्ण बरा होवू शकतो.
- सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे टाळा. अनावश्यक प्रवास टाळावा.
- अफवा आणि चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नका आणि त्या पसरवू नका.


**आपणास वरील लक्षणे दिसून आली तर त्वरीत आपल्या जवळच्या आरोग्य केंद्रामध्ये संपर्क साधा किंवा खालील क्रमांकावर संपर्क साधा :**

**टोल फ्री क्र. : 104**

**राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्र. : 020-26127394**

**राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. : 011-23978046**





समर्थ रामदास स्वामी रचित

# ॥ मनाचे श्लोक ॥

समर्थांच्या मते माणसाने दुसऱ्याला उपदेश करण्यापेक्षा स्वतः सुधारावे, स्वतःमध्ये बदल घडवून आणावा आणि इतरांना मदत करावी. जीवन आनंदाने कसे जगावे आणि सर्वांशी प्रेमाने कसे वागावे याची कला शिकविणारा ग्रंथ म्हणजे मनाचे श्लोक होय. समर्थ रामदास रचित

"मनाचे श्लोक" अर्थासहित मालिका - भाग १६

*जय जय रघुवीर समर्थ ।*

श्लोक क्र. ८१

मना मत्सरें नाम सांडूं नको हो ।
अती आदरें हा निजध्यास राहो ।
समस्तांमधें नाम हें सार आहे ।
दुजी तूळणा तूळितां ही न साहे ॥

हे मना, नामाचा मत्सर करून ते सोडून देऊ नकोस, नामाबद्दल पूज्य भाव बाळगून त्याचा ध्यास घ्यावा. सर्व साधनांमध्ये नाम हे सार आहे. त्याची कोणत्याही साधनाशी तुलना करता येणे शक्य नाही.

श्लोक क्र. ८२

बहू नाम या रामनामीं तुळेना ।
अभाग्या नरा पामरा हें कळेना ।
विषा औषध घेतलें पार्वतीशें ।
जिवा मानवा किंकरा कोण पूसे ॥

भगवंताची अनेक नामे आहेत, पण त्यात रामनाम हे श्रेष्ठ आहे.
परंतु ही गोष्ट बिचाऱ्या मनुष्यास कळत नाही.
हलाहल विषाचा दाह नाहीसा करण्यासाठी शंकराने राम-नाम घेतले,
तेथे बापड्या मनुष्याच्या मताला काय किंमत ?

श्लोक क्र. ८३

जेणें जाळिला काम तो राम ध्यातो ।
उमेसी अती आदरें गूण गातो ।
बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें ।
परी अंतरीं नामविश्वास तेथें ॥

ज्या शंकराने कामदेवास जाळून टाकले, तो रामाचे ध्यान करतो.
तो शंकर मोठ्या पूज्य भावनेने पार्वतीला रामाचे गुण-वर्णन सांगतो.
शंकराचे ठिकाणी मोठे ज्ञान, वैराग्य आणि सामर्थ्य वसते,
तरीही त्याच्या मनात नामाबद्दलचा दृढ विश्वास आहे.

श्लोक क्र. ८४

विठोनें शिरीं वाहिला देवराणा ।
तया अंतरीं ध्यास रे त्यासि नेणा ।
निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी ।
जिवां सोडवी राम हा अंतकाळीं ॥

पांडुरंगाने महादेवाला डोक्यावर धारण केले आहे. त्या महादेवाला प्रभू रामाचा ध्यास लागलेला आहे. हे तुम्हांला ठाऊक नाही काय ?
राम-नामामुळे महादेवाचा दाह दूर झाला. तो रामच जीवांना अंतकाळी सोडविणारा आहे, म्हणून त्याचा नाम-जप करा.

श्लोक क्र. ८५

भजा राम विश्राम योगेश्वरांचा ।
जपू नेमिला नेम गौरीहराचा ।
स्वयें नीववी तापसी चंद्रमौळी ।
तुम्हा सोडवी राम हा अंतकाळीं ॥

प्रभू रामाचे भजन केल्यामुळे श्रेष्ठ योग्यांनाही शांतता लाभते. महादेव हा नित्य नेमाने राम-नामाचा जप करतो.
राम-नामामुळे महादेवाचा दाह दूर झाला.
तसाच, तुम्हांला अंतकाळी रामच तारणारा आहे, तेव्हा त्याचा जप करा.



# १२ जानेवारी - राष्ट्रीय युवा दिन

## स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातला युवक कसा असावा

चेहऱ्यावर तेज आहे
देहामध्ये शक्ती आहे
मनामध्ये उत्साह आहे
बुद्धीमध्ये विवेक आहे
हृदयामध्ये करुणा आहे
मातृभूमीवर प्रेम आहे
इंद्रियांवर संयम आहे
मन ज्याचे स्थिर आहे
आत्मविश्वास दृढ आहे
इच्छाशक्ती प्रबळ आहे
धाडसाचे बळ आहे
सिंहासारखा निर्भय आहे
ध्येय ज्याचे उच्च आहे

सत्य ज्याचा ईश्वर आहे
व्यसनांपासून मुक्त आहे
जीवनामध्ये शिस्त आहे
प्रेमळ ज्याचा सूर आहे
मानवता हेच कुळ आहे
गुरुजनांचा आदर आहे
पालकांवरती श्रद्धा आहे
दीन-दुबळ्यांचा मित्र आहे
सेवेसाठी तत्पर आहे
देवावारती भक्ती आहे
जीवनामध्ये नीती आहे
चारित्र्य ज्याचे शुद्ध आहे
तोच आदर्श युवक आहे



## माहे जानेवारी दिनविशेष

१ जानेवारी:- जागतिक शांतता दिवस

११ जानेवारी:- स्व. लाल बहादूर शास्त्री पुण्यतिथी

१२ जानेवारी:- राष्ट्रीय युवा दिन, राजमाता जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती

१५ जानेवारी:- भारतीय सेना दिवस

२३ जानेवारी:- स्व. नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

२५ जानेवारी:- राष्ट्रीय मतदार दिवस

२६ जानेवारी:- प्रजासत्ताक दिवस

२८ जानेवारी:- लाला लजपतराय जयंती

३० जानेवारी:- शहीद दिवस, महात्मा गांधी पुण्यतिथी, राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण दिन



# लॉकर संबंधीचे रिझर्व बँकेचे नवे निर्देश

रिझर्व्ह बँकेने बँकांतील लॉकर संबंधी जारी केलेल्या दिनांक १८.०८.२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार नमूद केले आहे की, प्रत्येक बँक विद्यमान लॉकरधारक, लॉकरच्या प्रतिक्षेत असलेले संभाव्य ग्राहक आणि कोअर बँकिंग प्रणालीतीत प्रतिक्षा यादीत असलेले ग्राहक यांची शाखानिहाय अद्ययावत यादी तयार करेल. तसेच लॉकर उघडणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला बँक पोचपावती देईल.

बँकेत लॉकर घेऊन त्यात आपली मौल्यवान चीजवस्तू ठेवण्याची इच्छा प्रत्येक सुजाण नागरिकाला असते. मात्र बऱ्याचदा आपले खाते ज्या बँकेत आहे त्या बँकेत आपल्याला हक्काने लॉकर मिळतोच असे नाही. यापुढे कोणत्याही बँकेत लॉकर उघडता येणार आहे. तसेच या लॉकरच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी संबंधित बँकेवर राहणार आहे. यासंदर्भात रिझव्ह बँकेने मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली आहेत. ही तत्वे १ जानेवारी २०२२ पासून लागू झाली आहेत.




या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रत्येक बँकेला तिच्याकडे असलेल्या रिकाम्या लॉकर्सची शाखानिहाय अद्ययावत यादी ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे किती व्यक्तींनी लॉकरसाठी मागणी केली आहे व त्यांना बँकेने प्रतिक्षा यादीत टाकले आहे. याचीही शाखानिहाय अद्ययावत नोंद बँकेजवळ असणे रिझर्व्ह बँकेने बंधनकारक केले आहे. यामुळे लॉकर देताना बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून कोणताही गैरप्रकार होऊ नये याची काळजी रिझर्व्ह बँकेने घेतली आहे.

बैंक कर्मचाऱ्यांकडून भ्रष्टाचार झाल्यास, बैंक शाखा असलेल्या इमारतीस आग लागल्यास इमारत पडल्यास, बँकेत चोरी झाल्यास लॉकरमधील मौल्यवान ऐवजाच्या सुरक्षेची जबाबदारी संबंधित बँकेवर त्या लॉकरच्या वार्षिक भाडयाच्या १०० पट राहील. धोकादायक किंवा बेकायदेशीर ऐवज बँक लॉकरमध्ये ठेवला जाऊ नये यासाठी बँकेला लॉकर करारात तसे कलम घालावे लागेल. प्रत्यक्ष लॉकर दिला गेलेल्या ग्राहकाला त्याची पोचपावती बँकेने देणे आवश्यक आहे. तसेच लॉकर मिळण्यासाठी अर्ज करून प्रतिक्षा यादीत असलेल्या प्रत्येक संभाव्य ग्राहकाला प्रतिक्षा यादी क्रमांकही बँकेने देणे गरजेचे होणार आहे.

बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांचे लॉकर सांभाळताना हेळसांड झाल्यास अशावेळी ग्राहकाला कशा प्रकारे नुकसानभरपाई दिली जावी, यासाठी निश्चित धोरण तयार करून त्याला संबंधित बँकेच्या संचालक मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

भूकंप, वादळ, पूर, वीज पडणे अशा नैसर्गिक आपत्तीमुळे लॉकरचे व त्यातील मौल्यवान ऐवजाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित बँकेवर राहणार नाही. अर्थात अशा कोणत्याही प्रकारे लॉकरचे नुकसान होऊ नये याची काळजी बँकेने घ्यायची आहे.

लॉकरचे भाडे लॉकर धारकाकडून वेळेवर यावे यासाठी त्या ग्राहकाकडून लॉकर उघडतेवेळी मुदत ठेव घेण्याची बँकेला मुभा असणार आहे. सध्या ज्यांचे लॉकर आहेत, अशा लॉकरधारकांना मुदतठेव ठेवण्याची आवश्यकता नाही. या जुन्या ग्राहकांकडून बँक तशी मागणी करू शकणार नाही.

लॉकरचे भाडे आगाऊ घेतले आणि त्यानंतर त्या ग्राहकाने लॉकरसुविधा बँकेला परत केल्यास उरलेल्या कालावधीचे भाडे बँकेने ग्राहकाला परत करावे लागणार आहे.

सौजन्य महाराष्ट्र टाइम्स ★ ★ ★

# कर्जदारांना वन-टाइम सेटलमेंटचा अधिकार नाही : सर्वोच्च न्यायालय

## 'न्यायालय बँकांना थकबाकीदारांना मुदतवाढ देण्याची सक्ती करू शकत नाही'


बेईमान कर्ज थकबाकीदारांना सरफेसीच्या कायद्याच्या कठोरतेतून सुटण्यापासून रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण कायदा, सुप्रीम कोर्टाने बुधवारी निर्णय दिला की कोणतेही न्यायालय बँक किंवा वित्तीय संस्थेला (एफ.आय) जेव्हा बँक किंवा एफ. आयचे मत होते की ते कर्ज वसूल करण्यास सक्षम असतील तेंव्हा कर्जदाराला वन-टाइम सेटलमेंट (ओटीएस) ऑफर करण्याचे निर्देश देऊ शकत नाही.

सरफेसी कायद्याची कार्यवाही प्रलंबित असल्याची बँकेची विनंती असूनही 'बिजनौर अर्बन कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेडला' डिफॉल्टरला ओटीएस देण्याबाबत विचार करण्याचे निर्देश अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिले होते. हा आदेश बाजूला ठेवून न्यायमूर्ती एमआर शाह आणि बीव्ही नागरथना साल्ड यांच्या खंडपीठाने 'कर्जदार पेमेंट करण्यास सक्षम आहे, तसेच कारवाईद्वारे बँक कर्जाची संपूर्ण रक्कम परत मिळवण्यास सक्षम आहे, अशा परिस्थितीत न्यायालय बँकेस कर्जदाराला वन-टाइम सेटलमेंट (ओटीएस) ऑफर करण्याचे निर्देश देऊ शकत नाही.

निकाल लिहिताना न्यायमूर्ती शाह म्हणाले, OTS योजनेंतर्गत कर्जदाराला कर्ज खात्यात देय असलेल्या रकमेपेक्षा कमी रक्कम भरावी लागते. OTS योजना ऑफर करताना बँकेचा असा हेतू असू शकत नाही. आणि अशा अप्रामाणिकपणाला प्रोत्साहन देणे हा योजनेचा उद्देश असू शकत नाही

खंडपीठाने म्हटले, कोणत्याही बँकेला ओटीएस योजनेंतर्गत कमी रक्कम स्वीकारण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. जर बँक सुरक्षित मालमत्तेचा/गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा लिलाव करून संपूर्ण कर्जाची रक्कम वसूल करण्यास सक्षम आहे. अशावेळी बँकेचा परिणामी सभासदांचे व ठेवीदारांचे नुकसान होवू न देता ती बँक नेहमीच बँकेच्या हितासाठी आणि तिच्या व्यावसायिक शहाणपणाने योग्य निर्णय घेईल.

★ ★ ★



### अमृतवचन

## व्यक्तिगत गुणांचे सार्थक कधी होईल ?

– डॉ. केशव हेडगेवार, संस्थापक, रा.स्व.संघ.

संघटनाशास्त्रात गर्वाला, फुशारकीला व जबरदस्तीला किंवा व्यक्तिगत महत्त्वाला जागाच असू शकत नाही. संघटन हा शब्द असेच ध्वनित करतो की त्यात व्यक्तित्व सामावू शकत नाही. व्यक्तित्वाचे तट्टू पुढे दामटल्यास संघटन होणार नाही. परंतु संघटनेला आदर्श व्यक्तिमत्वाची अत्यंत जरुरी आहे. तुमच्या गुणांना दुसरीकडे वेगळ्या प्रकारची किंमत येईल व त्याचा मोबदला तुम्हाला कीर्तीच्या रूपाने मिळेल यात संशय नाही. परंतु त्याच गुणांचे सार्थक संघटनेसाठी तुमचे सर्वस्व खर्च केल्यानेच होणार आहे.

# पी. पी. एफ

### पीपीएफ मध्ये गुंतवणूक करण्याचे फायदे

१. सार्वजनिक भविष्य निर्वाहनिधी (पीपीएफ ) ही करबचत करणारी एक सरकारी योजना आहे.

२. ही १५ वर्षांची योजना आहे. त्याची मुदत पाच-पाच वर्षांसाठी कितीही वेळा वाढविता येते.

३. निवडक बँका आणि टपाल कार्यालयात (पोस्ट) हे खाते उघडता येते.

४. एका आर्थिक वर्षात कमीत कमी ५०० रुपये व जास्तीत जास्त १.५० लाख रुपये भरता येतात.

५. स्वतःच्या नावे, तसेच अज्ञान मुला-मुलींच्या नावे 'पीपीएफ' चे खाते उघडता येते. सर्वांच्या खात्यात मिळून रु.१,५०,००० भरता येतात.

६. एका व्यक्तीला एकच खाते उघडता येते.

७. करबचतीबरोबर करमुक्त उत्पन देणारी ही सुरक्षित योजना आहे.

८. 'पीपीएफ' मधील गुंतवणुकीवर आयकर कायदा कलम ८० सी अंतर्गत वजावट मिळते.

९. यातील गुंतवणुकीवर मिळणारे व्याज (चालू तिमाहीत ७.१ टक्के) करमुक्त आहे. कलम १० (||)

१०. 'पीपीएफ' च्या खात्यातून सहा आर्थिक वर्षे पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार अंशतः पैसे काढता येतात.

११. पीपीएफ खात्यावर नॉमिनीचे नाव टाकावे.

१२. पीपीएफ खात्यावर बँक किंवा इतर कोणत्याही प्रकारची अॅटॅचमेंट येऊ शकत नाही.

### काही बदलांबाबत महत्वपूर्ण माहिती.

नोकरी तसेच व्यवसाय करणारे बहुतेक जण सुरक्षित गुंतवणूक व प्राप्तिकरात ईईई (एक्झम्प्ट, एक्झम्प्ट, एक्झम्प्ट) पद्धतीने मिळणारी करसवलत विचारात घेऊन पीपीएफ मध्ये गुंतवणूक करीत असतात. यातून कर बचत तर होतेच, शिवाय दीर्घकालीन उद्दिष्टांची तरतूदसुद्धा केली जाते. अशा या बहुगुणी गुंतवणूक पर्यायाची लवचिकता आणखी वाढवून जास्तीत जास्त लोकांनी या योजनेचा लाभ घ्यावा म्हणून केंद्र सरकारने यात काही बदल केले आहेत.

पूर्वी पीपीएफ खात्यात एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त १२ वेळा रक्कम जमा करता येत होती. आता ही मर्यादा काढली असून आपण एका आर्थिक वर्षात कितीही वेळा गुंतवणूक करू शकता. गुंतवणूक र ५० व ५०च्या पटीत असणे आवश्यक आहे. एकूण गुंतवणुकीची मर्यादा पूर्वीप्रमाणेच र १.५ लाख इतकी असेल. पीपीएफ खातेदारास खाते उघडल्यापासून तिसऱ्या ते सहाव्या आर्थिक वर्षापर्यंत जी कर्ज मिळण्याची सुविधा आहे, त्या कर्जावरील व्याजदर आता १ टक्क्याने कमी केला असून आता कर्ज घेताना पीपीएफ वर जो व्याज दर मिळत असेल त्यापेक्षा १ टक्के जास्त दराने कर्ज मिळेल. याआधी २ टक्के जास्त दराने कर्ज मिळत असे. उदाहरणार्थ, सध्या पीपीएफ वर ७.१ टक्के इतक्या वार्षिक दराने व्याज मिळते आणि जर नियमानुसार कर्ज घेतले, तर कर्ज रकमेवर ८.१ टक्के वार्षिक दराने व्याज आकारणी केली जाईल. विशेष म्हणजे ज्या महिन्यात कर्ज घेतले असेल, त्या महिन्याच्या पहिला दिवसापासून ते ज्या महिन्यात कर्जाचा शेवटचा हप्ता भरला असेल त्या महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत व्याज आकारणी केली जाईल.

मात्र इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की आपण घेतलेल्या कर्ज रकमेवर जरी केवळ १ टक्के दराने व्याज आकारणी होत असली, तरी कर्ज रकमेइतक्या पीपीएफ मधील रकमेवर कर्ज फिटेपर्यंत व्याज मिळत नाही. पंधरा वर्षांची पीपीएफ खात्याची मुदत



संपल्यावर खाते बंद केलेच पाहिजे असे नाही. तर, आपण खात्याची मुदत ५ वर्षांच्या पटीत कितीही वेळा वाढवू शकता व आता अशी मुदत वाढविण्यासाठी दोन पर्याय आहेत. अ) योगदानासहित मुदत वाढ (वुईथ कॉन्ट्रिब्युशन), ब) योगदानाशिवाय मुदत वाढ (विदाऊट कॉन्ट्रिब्युशन). यातील योगदानासहित मुदत वाढीचा पर्याय स्वीकारला, तर आधीच्या प्रमाणे दर वर्षी किमान र ५०० तर कमाल र १.५ लाख करता येईल. योगदानाशिवाय पर्याय स्वीकारला तर खात्यात रक्कम जमा करायची नसून शिल्लक रकमेवर कर मुक्त व्याज मिळत राहील. खात्याची मुदत वाढविण्यासाठीचा आधीचा फॉर्म रद्द झाला असून आता फॉर्म ४ भरून पीपीएफ खात्याची मुदत पुढील ५ वर्षांसाठी वाढविता येते. मात्र यासाठी एक वर्षाच्या आत फॉर्म ४ भरून देणे आवश्यक आहे व या फॉर्ममध्ये आपणास कोणता पर्याय हवा आहे याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच ५ वर्षांची मुदत संपल्यावर मुदत वाढीसाठी याप्रमाणे पूर्तता करावयाची आहे.

विशेष म्हणजे योगदानासहित मुदत वाढ केल्यास गरज पडल्यास यातील रक्कम काढता येते. ती या प्रमाणे – मुदत संपताना खात्यावर शिल्लक असलेल्या रकमेच्या ६० टक्के इतकी रक्कम एकदा किंवा पुढील ५ वर्षांत कधीही वर्षातून एकदाच या पद्धतीने ६० टक्क्यांपर्यंत काढता येईल. उदाहरणार्थ, आपल्या खात्याची मुदत मार्च २०२१ला संपली असून खात्यात २० लाख रक्कम शिल्लक आहे. खात्याची मुदत योगदानासहित वाढविली असेल, तर मुदत वाढवताना एकरकमी १२ लाख किंवा पुढील ५ वर्षांत मिळून १२ लाख, तेही एका वर्षी एकदाच या पद्धतीने काढता येतील. याउलट जर आपण खात्याची मुदत योगदानाशिवाय पद्धतीने वाढवली असेल, तर पुढील ५ वर्षांत र २० लाख ही रक्कम आपण एकरकमी किंवा त्याहून कमी, परंतु वर्षातून एकदाच काढू शकाल. पीपीएफ वर घेतलेले कर्ज ३६ महिन्यांत फेडायचे असून या कालावधीत कर्ज परतफेड पूर्णपणे झाली नाही किंवा अंशतः झाली, तर ६ टक्के अधिक दराने व्याज द्यावे लागेल. मुदतपूर्व पीपीएफ खाते बंद करण्याच्या दृष्टीने आता काही बदल करण्यात आले आहेत. आता खाते उघडून ५ आर्थिक वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असेल, तर खालील कारणास्तव खाते मुदतपूर्व बंद करता येईल. खातेदार स्वतः किंवा पत्नी/पती, अवलंबून असणारी मुले व आई/वडील यांच्या गंभीर आजाराच्या वैद्यकीय उपचारासाठी. स्वतःच्या तसेच पत्नी व मुलांच्या शिक्षणासाठी (यासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या/संस्थेच्या प्रवेशाची व फी यांसारखी कागदपत्रे द्यावी लागतात). खाते उघडल्यानंतर खातेदार नोकरी, व्यवसायानिमित्त परदेशी गेला असल्यास व तो आता अनिवासी भारतीय असेल, तर त्याला आपले खाते मुदतपूर्व बंद करता येते. त्यासाठी पासपोर्ट, व्हिसा यांसारखी कागदपत्रे सोबत जोडावी लागतात.

आता आपले पीपीएफ खाते एका बँकेतून दुसऱ्या बँकेत अथवा पोस्टात किंवा पोस्टातून बँकेत ट्रान्स्फर करता येते. तसेच एचडीएफ सी, आयसीआयसीआय, ॲक्सिस, आयडीबीआय यांसारख्या खासगी बँकेत उघडता किंवा ट्रान्स्फर करता येते.

पीपीएफ खात्याला आता नॉमिनेशन देणे बंधनकारक असून आपण एक किंवा त्याहून अधिक नॉमिनी देऊ शकता. जर आपण एकापेक्षा जास्त नॉमिनी देणार असाल, तर प्रत्येक नॉमिनीचा किती हिस्सा असेल याबाबत उल्लेख करता येतो. उदा, आपण पत्नी/पती व दोन अपत्ये असे नॉमिनेशन करणार असाल तर आपण पुढीलप्रमाणे आपल्याला हव्या त्या टक्केवारीनुसार नॉमिनेशन करू शकता. पत्नी ५० टक्के, अपत्यांना प्रत्येकी २५ टक्के, पत्नी ४० टक्के, एक अपत्य ४० टक्के व दुसरे अपत्य २० टक्के, पत्नी ३४ टक्के, अपत्यांना प्रत्येकी ३३ टक्के. तरी पीपीएफ खातेदाराने वरील बदल समजून घेऊन आपल्या खात्यावरील व्यवहार करावेत.

★ ★ ★

# हिंदू अविभक्त कुटुंब



प्रस्तावना– मराठीतील हास्य कवी अशोक नायगांवकर विनोदाने कुटुंबाची व्याख्या करतात की, 'ज्या कुटुंबात आई आणि वडील एकत्र राहतात त्या कुटुंबास एकत्र कुटुंब समजावे'. भारतीय आयकर कायद्यात हिंदू अविभक्त कुटुंबाला एक स्वतंत्र दर्जा देण्यात आला आहे. थोर समाजसेविका इरावती कर्वेच्या अथक अभ्यासाने हे सिद्ध केले की हिंदू अविभक्त कुटुंब हे एक शाश्वत आणि चिरंतन अस्तित्व असलेले स्वतंत्र अधिष्ठान आहे. या लेखात हिंदू अविभक्त कुटुंबा– बद्दलच्या घटनात्मक व्यावसायिक स्थानाबद्दल कायदेशीर मुद्दे समजून घेण्याचा प्रयत्न करू.

परिचय – 'हिंदू अविभक्त कुटुंब' ह्या संकल्पनेत तीन शब्द आहेत. 'हिंदू' हा केवळ धर्म नाही तर जीवन जगण्याची एक पद्धत आहे असे सर्वोच्च न्यायालयाने 'इस्माइल फारूख विरुद्ध भारत सरकार' या निवाड्यात म्हटले आहे. पूर्वी मुस्लिम वारसदारांच्या संपत्तीची विल्हेवाट हिंदू परंपरेनेच होत असे. मुस्लिम लीगने स्वतंत्र वारस कायद्याची मागणी केली. ब्रिटिश पार्लमेंटने समाजात अनायासे तेढ निर्माण करण्याची संधी समजून १९३७ ला शरीयत कायदा मंजूर केला. सिंधु नदीच्या पूर्वेकडील भूभाग म्हणजे 'हिंदू' अशी विस्तृत व्याख्या मराठी विश्वकोशात दिली आहे. बौद्ध, शिख, जैन, आर्य, प्रार्थना, ब्रह्मो, शैव, वैश्य आणि लिंगायत समाजाला हिंदू वारसा कायदा लागू होतो. पाकिस्तान आणि बांगला देश कायद्यात हिंदू अविभक्त कुटुंबास 'असोसीएशन ऑफ पर्सन्सचा दर्जा देवून एक कायदेशीर व्यक्ती मानले गेले. नेपाळ आणि भूतानमध्ये एका अविवाहीत व्यक्ती करदात्यापेक्षा वैवाहीक दांपत्याला कमी टॅक्स द्यावा लागतो. म्हणजे एका एकट्या व्यक्तीला तीन लाख रुपये करमाफ मर्यादा आहे तर विवाहीत दांपत्याला कर माफ मर्यादा साडेतीन लाख रुपये आहे. भारतात गोवा, दादरा, नगर हवेली, दमण दिवसारख्या केंद्रशासित प्रदेशात 'पोर्तुगीज सिव्हिल कोड' लागू आहे. पगाराव्यतिरिक्त मिळालेले उत्पन्न जीवनसाथीस विभागून आलेल्या रकमेवर टॅक्स भरण्याची सूट मिळते. अविभक्त म्हणजे सपिंड एकत्र राहत असलेले वंशज. यात दतक पुत्र आणि दतक कन्यांचा, अनौरस संततीचा देखील समावेश असतो. मानसपुत्र / कन्या सावत्र मुलगा/ मुलगी हिंदू कुटुंबाचा घटक होवू शकत नाही. कुटुंब म्हणजे नात्यांची वंशपरंपरागत उतरंड, एकत्र नांदत असलेले नातेसंबंध उदाहरणार्थ पुत्र, पिता, पितामह, प्रपितामह यांचे रेषात्मक गटसमूह सरकारी खजिन्यातील योगदानाचे पेमेंट करण्यासाठी औद्योगीकरणापूर्वी बारा बलुतेदारीत एकत्र कुटुंबाचा एखादा सदस्य गावप्रमुखाकडे राबत असे.

एकत्र हिंदू कुटुंबाची ओळख–

सन १७६७ मध्ये बंगालच्या दोन सुखवस्तू कुटुंबाच्या कलहामुळे 'एकत्र कुटुंब व्यवस्था' अस्तित्वात आहे हे ब्रिटिश न्यायालयाने मान्य केले. सुपर टॅक्स बिल, १९१७ नुसार आयकर कायदा १९२२ मध्ये हिंदू अविभक्त कुटुंबास' करदाता म्हणून स्थान देण्यात आले. कर कायद्यानुसार सर्व व्यक्ती करदाते आहेत. पण सर्व करदाते कायदेशीर व्यक्ती नाहीत. हिंदू अविभक्त कुटुंब कर कायद्यात स्वतंत्र व्यक्ती नसते. एका सिंगल व्यक्तीचे हिंदू अविभक्त कुटुंब होत नाही. वाडवडिलांच्या प्रॉपर्टीपासून सतत उत्पन्न मिळवणारी फॅमिली म्हणजे 'एचयूएफ'. देवराई, आमराई, देवस्थान, गृहसंपत्ती (हवेली, वाडा, चाळ). गुंतवणुकीचे व्याज असे पॅसिव्ह उत्पन्न असल्यास व्यवसाय संघटनेचा हा उत्तम प्रकार ठरतो. हिंदू अविभक्त कुटुंबास प्रोफेशनल स्वरूपाचे इन्कम मिळत नसते. दोन भावांची वाटणी झाल्यानंतर रि–युनियनद्वारे पुन्हा एकत्र कुटुंबाची स्थापना होवू शकते.

हिंदू व्यक्ती त्याच्या खासगी उत्पन्नाशिवाय हिंदू अविभक्त कुटुंबाचे वेगळे उत्पन्न दाखवू शकते. वैयक्तिक उत्पन्नाप्रमाणे एकत्र कुटुंबाचे स्लॅब / उत्पन्न मर्यादा वेगळी मोजली जाते. दोन्ही उत्पन्नांची एकत्र बेरीज करण्याची गरज नसते.

हिंदू मान्यतेप्रमाणे प्रत्येक दाम्पत्य हे एकत्र कुटुंबच मानले जाते. केवळ पती आणि पत्नी (कर्ता आणि सदस्य) दोन सदस्यांचे एक अविभक्त कुटुंब समजले जाते. पारंपारीक पद्धतीने अग्नीसाक्ष सप्तप्रदक्षिणा विवाह संपन्न झाल्याची वेळ समजली जाते. डिजिटल युगात 'आपले सरकार' संकेत स्थळावरून विवाहाचे नोंदणीकृत प्रमाणपत्र डाऊनलोड करून कायदेशीर सबळ पुरावा असावा.

फॉर्म '४९' सोबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र आणि कर्त्याचे घोषणापत्र जोडल्यास हिंदू अविभक्त कुटुंबाचे पॅन (कायम स्थायी क्रमांक) मिळते. पॅनमध्ये चौथे अक्षर 'एच' असते. पॅनमधले पाचवे अक्षर करदात्याचे आरंभीचे अद्याक्षर असते. संयुक्त हिंदू कुटुंबाच्या पॅनकार्डवर फोटो नसतो. संयुक्त हिंदू कुटुंबाचे स्वतंत्र बँक खाते उघडता येते. एकत्र हिंदू कुटुंबाला भागभांडवल (शेअर्स मार्केट) विमा मुदत ठेवीत गुंतवणूक करता येते. क्रमशः

★ ★ ★

# आत्मविश्वास...!

एक व्यावसायिक कर्जात बुडाला होता आणि त्यातून बाहेर पडण्याचा कुठलाही मार्ग त्याला सुचत नव्हता. धनको त्याच्या घरी वारंवार चकरा मारीत होते आणि पुरवठादार बिलाच्या रकमेचा तगादा लावून होते. असाच तो एका बगिच्यातील बेंचवर डोके हातांनी धरून बसला होता. या कर्जाच्या सापळ्यातून वाचण्यासाठी काहीतरी चमत्कार घडावा, असे त्याला खूप वाटत होते.

अचानक एक वृद्ध त्याच्यासमोर उभा झाला. मला वाटते तू खूप अडचणीत आहेस, मला वाटते मी तुला मदत करू शकतो. वृद्धाने त्याला नाव विचारले आणि एक चेक लिहून त्याच्या हाती दिला. हे पैसे घे. आजपासून बरोबर एका वर्षानंतर मला याच ठिकाणी भेट आणि त्यावेळी ही रक्कम मला परत करशील, असे म्हणून तो वळला आणि वेगाने दिसेनासा झाला.

व्यावसायिकाने हातातील चेककडे पाहिले. तो ५ लाख डॉलर्सचा होता. खाली सही होती जॉन डी. रॉकमेलर, जगातील सर्वांत श्रीमंतापैकी एक. या रकमेतून माझे कर्ज चुटकीसरशी संपेल, व्यावसायिक पुटपुटला. परंतु त्याऐवजी व्यावसायिकाने तो चेक न वटविता तसाच ठेवून दिला. आता आपल्याजवळ ५ लाख डॉलर्सची रक्कम केव्हाही तयार आहे, या आत्मविश्वासाने तो कामाला लागला. नव्या उमेदीने तो कारभार बघू लागला. त्याने आधीच्या करारांना पुन्हा वाटाघाटी करून फायदेशीर करून घेतले आणि पैसे देण्याची मुदतही वाढवून घेतली. काही मोठे करार रद्द केले. काही महिन्यातच, तो कर्जाच्या सापळ्यातून बाहेर आला आणि पुन्हा कमाई करू लागला.

बरोबर एका वर्षानंतर तो त्याच बागेत न वटविलेला चेक घेऊन आला. ठरल्याप्रमाणे तो वृद्ध तिथे पुन्हा उपस्थित झाला. व्यावसायिक त्याला त्याचा चेक देणार आणि आपली यशाची गाथा सांगणार तेवढ्यात एक नर्स तिथे धावत धावत आली आणि तिने त्या वृद्धाला घट्ट पकडले. चला, शेवटी तुला पकडलेच, ती ओरडून व्यावसायिकाकडे बघून ती नर्स म्हणाली, याने तुम्हाला जास्त त्रास तर नाही ना दिला? हा नेहमी मनोरूग्णालयातून पळून जात असतो आणि लोकांना सांगतो की मी जॉन रॉकमेलर आहे म्हणून. असे म्हणून तिने त्या वृद्धाला ओढत नेले.

व्यावसायिक थक्क होऊन हे सर्व बघत होता. त्याला काहीच कळेनासे झाले. गेले वर्षभर आपल्याजवळ ५ लाख डॉलर्स रक्कम केव्हाही तयार आहे, या थाटात तो करार करीत होता. अचानक त्याच्या लक्षात आले की, त्याचे आयुष्य बदलवून टाकणारी ही किमया खऱ्या किंवा अस्तित्वात नसलेल्या त्या रकमेची नव्हतीच. तो त्याला नव्याने गवसलेला आत्मविश्वास होता. त्यानेच त्याला कर्जाचा डोंगर उपसण्याची शक्ती दिली होती.

तात्पर्य– आत्मविश्वासाने कोणतेही कार्य केल्यास यश हे हमखास मिळते..!!

★ ★ ★



# गणपती स्त्रोत्र

आपण असंख्य वेळेला हे गणपती स्तोत्र संकटनाशन
स्तोत्र म्हणतो, परंतु यामध्ये उल्लेख केलेल्या
गणेशाची प्रत्यक्ष स्थाने आपल्यापैकी बहुतेकांना
माहीत नाहीत....
नारदकृत - 'संकटनाशन' स्तोत्रात उल्लेखिलेली
बारा नावे व त्यांची सद्यस्थाने....



प्रथमं वक्रतुण्ड च
एकदन्तं द्वितीयकम् ।
तृतीयं कृष्णपिमाक्षं
गजवक्रं चतुर्थकम्
लम्बोदरं पंचमं च
षष्ठ विकटमेव च ।
सप्तमं विघ्नराजेन्द्रं
धूम्रवर्णं तुष्टम्
नवमं भालचन्द्रं च
दशमं तु विनायकम् ।
एकादशम् गणपति
द्वादशं तु गजाननम्



१. वक्रतुण्ड :- मद्रास राज्यातील कन्नूरजवळ
२. एकदन्त :- पश्चिम बंगालमध्ये कलकत्त्याजवळ.
३. कृष्णपिंगाक्ष :- मद्रास राज्यातील कन्याकुमारीजवळ.
४. गजवक्र :- ओरिसा राज्यात भुवनेश्वर येथे.
५. लंबोदर :- ह्याची दोन स्थाने उल्लेखिली जातात. (१) रत्नागिरी जिल्ह्यातील गणपती पुळे क्षेत्रात, (२) मध्यप्रदेशातील ओंकारेश्वर या प्रसिद्ध ज्योतिर्लिंगाजवळ असलेला पंचमुखी गणपती.
६. विकट :- हिमालयाच्या पायथ्याशी हृषीकेश येथे.
७. विघ्नराजेन्द्र :- कुरु क्षेत्रात कौरव-पांडवांच्या युद्धभूमीजवळ.
८. धूम्रवर्णं :- १) दक्षिणेकडील केरळ राज्यात कालिकतजवळ. २) तिबेटमध्ये ल्हासापासून १५ मैलांवर.
९. भालचंद्र :- रामेश्वरजवळ धनुष्कोडी येथे मद्रास राज्य.
१०. विनायक :- काशीक्षेत्रातील अन्नपूर्णामंदिराजवळचा धुण्डिराज गणेश.
११. गणपती :- क्षेत्र गोकर्ण महाबळेश्वर येथील द्विभुज महागणपती.
१२. गजानन :- हिमालयातील शेवटचे तीर्थस्थान पांडुकेसर येथील मुंडकटा गणेश. गौरी कुंडाजवळील ही गणेशमूर्ती शिरविरहित आहे.

समर्थ रामदास स्वामींनी ही बाराही गणेशस्थाने शोधून काढून सर्व गणपतींचे दर्शन घेतले होते, असे म्हणतात.

।। जय श्री गणेश ।।





भावपूर्ण श्रध्दांजली..!

# सिंधूताई सपकाळ.... माई !

– अभय भंडारी, विटा.



सिंधूताई सपकाळ गेल्या... आयुष्यभर असंख्य अनाथ जीवांचा उत्कट प्रेमाने सांभाळ करताना निर्माण झालेले सर्व पाश एका क्षणात तोडून माई अनंताच्या प्रवासाला निघून गेल्या. समर्पण आणि सिंधूताई हे जणू समानार्थी शब्द आहेत, हा संस्कार समाजमनावर त्यांनी केला.

त्यांच्या वाट्याला ऐन तारूण्यात आलेल्या दारूण दु:खाचा,अपमानाचा, असुरक्षिततेचा अनुभव, एका आश्रयाशिवाय जगणा–या स्त्रीचं जीणं किती भयंकर आहे,याच्या विदारक जाणीवेने माई अंतर्मुख झाल्या.

आपल्या सर्व दु:खाचे कारण आपलाच दुबळेपणा असून आपण स्वत: कणखर झाल्याशिवाय हे दु:ख आपली पाठ सोडणार नाही, याचा साक्षात्कार माईंना झाला. त्यांना स्वत:च्या जगण्याचा संघर्ष करताना त्यांच्यासारखे असंख्य जीव अवतीभवती दु:खाने होरपळून निघताना दिसले. जे जे दिसले, अनुभवले, त्या सर्वांचा अर्थ लावताना स्वत:च्या मनात डोकावून पाहताना माईंना आपल्या आत असलेल्या सुप्त सामर्थ्याचा अंदाज आला. त्यांनी भयंकर आपत्तींचा उपयोग करून स्वत:चा क्रमविकास साधला. अंधार फार झाला,तर त्यात खितपत न पडता दिवा लावावा ही अगदी सामान्य जाण आहे. पण माईंना याचे आकलन झाले की बाहेरील अंधार एकवेळ सहज दूर करता येईल,पण मनातला अंधार मनुष्याची जीवनेच्छाच खुडून टाकतो.तो कसा दूर करणार ? तो प्रेमाने,समर्पणाने दूर करता येतो. माईंच्या दुर्दम्य इच्छाशक्तीने अनेकांच्या मनातील अंधार दूर केला. अगदी सहज दिव्याने दिवा लावावा तसे हे महान कार्य त्यांच्या हातून जन्मभर अविरतपणे घडलं.

माईंना हे समजलं की या जगात जगण्याचं बळ देणारी सगळ्यात मोठी शक्ती प्रेम आहे. केवळ प्रेमाच्या दुष्काळानेच समाजात अनेक दु:ख मानवी जीवन उध्वस्त करताना दिसतात. केवळ अंतरिच्या प्रेमाचा साक्षात्कार न झाल्याने माणसे पशूंपेक्षा भयंकर वागतात. यातून समाज कधी आणि कसा बाहेर पडणार ? हे भल्या भल्याभल्यांना उमगले नाही.पण माईंनी त्यांच्या परिने या गहन समस्येवर उपाय शोधला.आईच्या कुशीत शिरून माझी हक्काची आई आहे, आणि ती मला कधीच दूर लोटणार नाही,ही जाणीव मनुष्याला या जगात कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याचं बळ देते. माईंनी अनाथ मुला मुलींचा नुसता सांभाळच केला नाही,तर त्यापुढे जाऊन त्या सर्वांमध्ये आपले दैवी प्रेमही संक्रमित केले.एक लहान मूल वाढवताना आजच्या डिजीटल युगात सुखवस्तु आई बापाची जी ओढाताण होताना दिसते, त्या पार्श्वभूमीवर माईंच्या असंख्य अपत्यांचा त्यांनी केलेला सांभाळ ही अत्यंत अद्भुत घटना आहे. माईंच्या या अफाट क्षमतेचं समाजाने चिंतन करावं, त्यापासून शिकावं, अनेक सामाजिक समस्या दूर करण्यासाठी माईंचे हे अंगभूत शहाणपण समाजाच्या हिताचे ठरेल. स्वामी विवेकानंद म्हणतात जेव्हा जेव्हा बुद्धी आणि ह्रदय यात मतभेद होईल, तेव्हा तेव्हा ह्रदयाचे ऐका.ते तुमच्या भल्याचे आहे.

आपल्या सामाजिक समस्या आपण बुद्धीवर खूप भिस्त ठेवून सोडवण्याचा प्रयत्न करतो,पण त्या न सुटता जास्त जटील होताना दिसतात. माईंनी केवळ प्रेमाने अनेकांच्या जीवनातील समस्या सोडवून त्याला सुंदर आकार दिला,हे उघड सत्य हा कल्याणकारी जीवनाचा वस्तुपाठ आहे. ज्या आत्मविश्वासाने माई जगभर फिरल्या, अनेक सेलेब्रिटींसमोर त्यांनी ठामपणे आपले अनुभव सांगितले,ते पाहून कोणीही विस्मयचकित होईल. या असाधारण आत्मविश्वासाचा उगम कुठे आहे ? तो प्रत्यक्ष केलेल्या कामातून येतो. स्वत:साठी च नव्हे तर इतरांसाठी जीवनातील असंख्य अडथळ्यांची शर्यत पार करण्याने ही उंची गाठता येते,हा विश्वास समाजाला माईंचे जीवन पाहून वाटायला हरकत नाही. सिंधूताई या भयंकर दु:ख कसं पचवावं,या चा आणि जगातील सर्वोच्च मानसन्मान वाट्याला आल्यावरही पाय जमिनीवर कसे असावेत या दोन्ही अवस्थांचा मानवी जीवनाला निरंतर मार्गदर्शक ठरेल असा दीपस्तंभ आहेत. माई लोकशिक्षिका होत्या. अनेकांचा आधार होत्या,प्रेरणा होत्या, आदर्श होत्या, पण या सगळ्याच्या पलिकडे एक आई होत्या. एक उत्कट मातृत्व हे तिर्थांनीही ज्यात पवित्रता शोधावी असं चालतं फिरतं तिर्थक्षेत्र होतं.माईंचा दिव्य सहवास ज्यांनी अनुभवला,त्यांनी त्याच तेजाची आराधना आपल्या जीवनात पुढे चालू ठेवणं हीच माईंना खरी श्रद्धांजली ठरेल. माईंच्या विराट कार्याला, त्यांच्या पवित्रतम आदर्श जीवनाला कृतज्ञ अभिवादन.

★ ★ ★

# सत्कार समारंभ - कु. वेदांतिका पवार

हजारमाचीच्या वेदांतिका पवारची राष्ट्रीय कुस्ती क्षेत्रातील 'सोनेरी' कामगिरीची दखल घेऊन तिचा यशवंत बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कुस्ती हा मर्दानी समजला जाणारा खेळ. कुस्ती खेळणारा केवळ पुरुषच असतो, महिलांचे हे क्षेत्र नाही हा समज खोडून टाकत कुस्ती क्षेत्रात दमदारपणे पाऊल टाकत हजारमाची ता. कराडच्या दंगल गर्ल वेदांतिका अतुल पवार हिने मेडल पदाला गवसणी घातली आहे.

आतापर्यंत दोन वेळा ब्रॉन्झ, एक वेळ रौप्य अशी तिन पदके मिळवलेल्या वेदांतिकाने मर्दानी आखाड्यात उतरून 'गोल्ड तो गोल्ड होता है छोरा लावे या छोरी' हे सिध्द केले आहे.

वेदांतिकाने आतापर्यंत शालेय स्पर्धेत राज्यस्तरावर गोल्ड मेडल मिळवले. नागपूर येथे झालेल्या सब ज्युनिअर महिला कुस्ती स्पर्धेत सिल्व्हर तर वर्धा येथे झालेल्या स्पर्धेत ब्रॉन्झ पदक, उत्तर प्रदेश येथे झालेल्या १५ वर्षे वयोगट नॅशनल चॅम्पियनशिप मध्ये ब्रॉन्झ पदक, इचलकरंजी येथे झालेल्या युनिर्व्हसिटी इंटरझोनमध्ये गोल्ड मेडल, सातारा येथे झालेल्या महिला कुस्ती स्पर्धेत गोल्ड, पुणे महापौर कुस्ती स्पर्धेत ब्रॉन्झ, उत्तरप्रदेश येथे झालेल्या ट्रॅडिशनल सिनियर मेन अॅण्ड वूमन फ्री स्टाईल नॅशनल ब्रिस्टलिंग चॅम्पियनशिपमध्ये रौप्य पदक मिळवले आहे.

वेदांतिकाचे आजोबा, वडिल यांनी पैलवानकी केली आहे. आजोबा पै.लक्ष्मणराव पवार व वडील अतुल पवार यांनी गावाचे कुस्ती मैदान गाजवले आहे. बालपणापासून कुस्तीचे बाळकडू मिळालेल्या वेदांतिकानेही वेगळं क्षेत्र म्हणून कुस्तीची निवड केली. 'सिर्फ बॉडी बनानेसे पहेलवानी नही होती, पहेलवानी खून मे होती है'. वेदांतिकाच्या रक्तातच कुस्ती असल्याने ग्रामीण भागात राहूनही उच्च विचारसरणी जपणाऱ्या अतुल पवार यांनी तिला कुस्ती प्रशिक्षणासाठी कोल्हापूरच्या स्व.सदाशिवराव मंडलिक कुस्ती आखाड्यात पाठवले.

रोज सकाळी ३ तास व सायंकाळी ३ तास व्यायाम व कुस्तीचा सराव सुरू ठेवला. कराड येथील एसएमएस येथे पहिले ते चौथीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर मुरगुड (कोल्हापूर) येथे ५ ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतले. सध्या कराड येथील वेणूताई चव्हाण कॉलेजमध्ये बी. ए. च्या पहिल्या वर्षात ती शिकत आहे. भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर मेडल मिळवून द्यायचे स्वप्न असून त्यासाठी मेहनत करण्याची तयारी असल्याचे वेदांतिका हिने सांगितले.

कु.वेदांतिकाचे यानिमित्ताने यशवंत बँकेच्या वतीने अभिनंदन करून बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.वैशाली मोकाशी यांच्या हस्ते सर्व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

★ ★ ★



# बँकेच्या खास ठेव योजना

Reg.No. SAT/BNK/27/1975

## दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण

'आपली गुंतवणूक सुरक्षितता केवळ बँकेतच,
कारण येथे आहे कुटुंबातील प्रत्येकाला,
रूपये ५ लाखांचे ठेव विमा संरक्षण..'



मा. शेखर चरेगांवकर
अध्यक्ष, दि यशवंत बँक लि., फलटण

### * ठेवींवरील व्याजदर *

| अ.नं. | ठेव प्रकार | मुदत | व्याजदर |
|---|---|---|---|
| १ | सेव्हिंग्ज ठेव | | ३.५० % |
| २ | स्पेशल सेव्हिंग्ज् ठेव | | ६.५० % |
| ३ | चिरंजिव सेव्हिंग्ज् ठेव | | ३.५० % |
| ४ | पिग्मी ठेव | | ३.०० % |
| ५ | सुपर फ्लेक्सी ठेव | | ५.०० % |
| ६ | अल्प मुदत | किमान १६ दिवस ते ९० दिवस | ५.५० % |
| ७ | अल्प मुदत | ९१ दिवस ते १८० दिवस | ५.७५ % |
| ८ | अल्प मुदत | १८१ दिवस ते ३६४ दिवस | ६.०० % |
| ९ | मध्यम मुदत | १ वर्ष | ७.२५ % |
| १० | मध्यम मुदत | १३ महिने ते २४ महिने | ७.७५ % |
| ११ | मध्यम मुदत | २५ महिने ते ६० महिने | ८.०० % |
| १२ | मासीक व्याज योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १३ | मधुमित्र योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १४ | आधार (जेष्ठ नागरीक) | ३ ते ५ वर्षे | ८.५० %* |
| १५ | दामदुप्पट ठेव | | ८ वर्षे |
| १६ | दामदिडपट ठेव योजना | | ४ वर्षे २ महिने |

'अ' वर्ग सभासद किंवा जेष्ठ नागरीक यांना १ वर्ष व त्यापुढील कालावधीकरीताच्या ठेवींना ०.२५ टक्के जादा व्याजदर

सर्व शाखांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कॅश सुविधा देणारी बँक

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेला अथवा ग्राहक सेवा केंद्राला भेट द्या...

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

* ग्राहक सेवा हा आमचा विभाग नसून स्वभावच आहे. *



### सुपर 6 रिकरिंग ठेव योजना

सुपर 6

मुदत ६ महिने

- दरमहा किमान रू. १०००/-

### विद्यालक्ष्मी आवर्त ठेव योजना

मुलांच्या शिक्षणासाठी अनोखी रिकरींग ठेव योजना
आपल्या पाल्यांचे शैक्षणिक भविष्य आजच सुरक्षित करूया.

### कुबेर मनी प्लस

मुदत ५ वर्षे

| दरमहा रक्कम | मिळणारी रक्कम | दरमहा रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| रू. 135/- | 10,000/- | रू. 680/- | 50,000/- |
| रू. 340/- | 25,000/- | रू. 1360/- | 1,00,000/- |

**धन संचय** — दरमहा रू. १००/- व त्या पटीमध्ये
मुदत १ ते ५ वर्षे (अपघाती विमा संरक्षण रू. ५० हजार)

**अमृत संचय** — दरमहा रू. ५००/- भरा व ६ वर्ष ६ महिन्यांनी घ्या
रू. ५०,०००/- (अपघाती विमा संरक्षण रू. ५० हजार)

**सुवर्ण संचय** — दरमहा रू. १०००/- भरा व ६ वर्ष ६ महिन्यांनी घ्या
रू.१,००,०००/- (अपघाती विमा संरक्षण रू. १ लाख)

### मासिक व्याज योजना (MIS)

- मुदत ३ ते ५ वर्ष
- व्याजदर ८.५०% (दरमहा उत्पन्नाची हमी)
- ज्येष्ठ नागरिक वय - ५५ वर्षे

ज्येष्ठ नागरिकांचे सन्मानार्थ

### स्वराज्य ७५ संजीवनी ठेव योजना

लसीकरण प्रोत्साहनासाठी १३ महिने मुदतीची

| | |
|---|---|
| १ लस घेतलेल्या नागरीकांसाठी | व्याजदर ८.२५% द.सा.द.शे |
| २ लस घेतलेल्या नागरीकांसाठी | व्याजदर ८.५०% द.सा.द.शे |
| लस न घेतलेल्या नागरीकांसाठी | व्याजदर ८.००% द.सा.द.शे |

### महालक्ष्मी ठेव योजना

| | |
|---|---|
| १५१ दिवस | ७% |
| २५१ दिवस | ७.२५% |

### सभासद आरोग्य वर्धिनी योजना

एकरकमी दरवर्षी रू. १०००/- शेअर्स घेणाऱ्या सभासदांकरीता
सुरक्षितता... ठेवींबरोबर आरोग्याचीही..

* ज्येष्ठ नागरिकांना घरपोहोच बँकींग सेवा... *





## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

### बँकेची वैशिष्टे

- बँक असल्याने प्रत्येक ठेवीदारास रू. ५ लाखांचे ठेव विमा संरक्षण...
- सर्वात कमी सुट्या असणारी सहकारी बँक...
- सर्व शाखांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कॅश सुविधा देणारी बँक
- कोरोना विषाणू काळातही कॅश देण्यावर कोणतीही मर्यादा नाही...
- बचत गटांना केवळ अर्थसहाय्य नव्हे तर प्रशिक्षण देणारी बँक...
- राष्ट्रीय महिला कोषकडून निधी घेणारी राज्यातील पहिली बँक...
- रिकरिंग ठेव (R.D) खात्यावर मिळणाऱ्या रकमेइतके अपघाती विमा संरक्षण देणारी एकमेव बँक...
- मधुमित्र ठेव योजनेत डायबेटिक ग्राहकांना दरमहा मोफत तपासणी...
- ग्रीन फ्युचर ठेव योजनेत ७५० वृक्षांची लागवड व यशस्वी संगोपन...
- यशवंत महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम सलग १० वर्षे संपन्न...
- बँकेचे तज्ञ व निस्वार्थी संचालक मंडळ...
- व्यवस्थापन खर्च अत्यंत अल्प प्रमाणात ठेवणारी बँक...
- सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम...
- प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत अग्रेसर होवून मदत कार्य करणारी बँक...

✻ ग्राहक सेवा हा आमचा विभाग नसून स्वभावच आहे. ✻

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेस भेट द्या.

**दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

# संकल्प २५ कोटी ठेव संकलनाचा

अभियानाअंतर्गत

## पतसंस्थांसाठी खास, जादा लाभाची ठेव योजना

### यशवंत 5 प्लस

- व्याजदर ८.५०%
- गुंतवणूक प्रती संस्था फक्त रू.५ लाख
- मुदत १५ महिने
- योजना ३१ डिसेंबर २०२१ पर्यंतच मर्यादित.



"बँकेतील आपला प्रत्येक रूपया सुरक्षित, कारण इथे प्रत्येक व्यक्ती व संस्थेला आहे. आता रूपये ५ लाखांचे विमा संरक्षण, आपणही आपल्या संस्थेची गुंतवणूक, यशवंत बँकेत करून या संकल्पपूर्तीत सहभागी वहावे, ही विनंती."

शेखर चरेगांवकर
अध्यक्ष, यशवंत बँक

**Bank Details For NEFT / RTGS**

| | |
|---|---|
| Benificery Name - | The Yashwant Co-Op Bank Ltd., Phaltan |
| Bank Name - | HDFC Bank Ltd. |
| Branch - | Phaltan |
| IFSC Code - | HDFC0002104 |
| Account No. - | 21040380000010 |

९ वर्षे सातत्याने ऑडीट वर्ग 'अ' असणारी आपली बँक, यशवंत बँक.

**दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेला अथवा ग्राहक सेवा केंद्राला भेट द्या...

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| ☎ (०२१६६) २२०५२० | ☎ (०२१६४) २२७४६७ | ☎ (०२१६२) २२९४६७ |
| मोबा. ८४०८८०२०२२ | मोबा. ७८७५५५८४९१ | मोबा. ९०४९६३३५५५ |

**Email :** yashwantbankkarad.com **Website :** yashwantbankkarad.com

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

फलटण-कराड-सातारा

बँकेच्या नव्या सभासदांसाठी खास आरोग्यदायी ठेव योजना

### ✻ सभासद आरोग्यवर्धिनी योजना ✻

सुरक्षितता... ठेवींबरोबर आरोग्याचीही..

| सभासद आरोग्यवर्धिनी - फेज १ | दरमहा रू. १००/- शेअर्स किंवा एकरकमी दरवर्षी रू. १०००/- चे शेअर्स |
|---|---|
| लॅबोरेटरी चार्जेस :- | |
| १) रक्त तपासणी (वर्षात कमाल मर्यादा रू. २००/-) | रू. १००/- |
| २) लघवी तपासणी (वर्षात कमाल मर्यादा रू.२००/-) | रू. १००/- |
| एक्स रे (वर्षातून एकदाच) | रू. १५०/- |
| कार्डीओग्राम (वर्षातून एकदाच) | रू. २००/- |
| डोळे तपासणी (वर्षातून एकदाच) | रू. १५०/- |
| डोळ्यांचे ऑपरेशन | रू. ५००/- |
| चष्मा खरेदी (एकदाच) | रू. २००/- |
| सोनोग्राफी (वर्षातून एकदाच) | रू. ३५०/- |
| सी.टी.स्कॅन (वर्षातून एकदाच) | रू. ५००/- |
| अंत्यविधी अनुदान | रू. १०००/- |

## कर्जावरील व्याज दर

| अ. नं. | कर्ज प्रकार | दि. ०१/०१/२०१७ पासून बदलेले सुधारित व्याजदर |
|---|---|---|
| १ | सामान्य कर्ज (जामीनकी तारण) | १६.00% |
| २ | स्थावर तारण कर्ज | १६.00% |
| ३ | हायपोथिकेशन कर्ज (जुने वाहन/मशिनरी) | १६.00% |
| ४ | हायपो. कॅश क्रेडीट कर्ज | १६.00% |
| ५ | यशवंत महिला स्वयंरोजगार कर्ज | १५.५0% |
| ६ | सोनेतारण | मुल्यांकनाच्या ५0% - १२%<br>मुल्यांकनाच्या ७५% - १४%<br>मुल्यांकनाच्या १00% - १६% |
| ७ | वाहनतारण कर्ज - मुदत ७ वर्षापर्यंत<br>वैयक्तिक वापराच्या वाहनाकरीता<br>व्यावसायिक वाहनाकरीता | <br>१२.00%<br>१३.00% |
| ८ | गृहबांधणी कर्ज<br>मुदत १५ वर्षापर्यंत | १२.00% |
| ९ | लघुउद्योग(SME) कर्ज रु. १० लाखांपर्यंत कॅश क्रेडिट व टर्म लोन मुदत १ ते ७ वर्षापर्यंत | १२.00% |
| १० | शैक्षणिक कर्ज | १२.00% |
| ११ | सी. आर. ई. कर्ज | १८.00% |



पोस्टल रजि. नं. : SATARA/049/2020-21 Dt.17/01/2020 ई- प्रकाशन १५ जानेवारी २०२२ MAHMAR/2010/31891


# घर तुमचं हक्काचं... तुमचं स्वतःचं...

# गृहप्रवेश

## गृहबांधणी/खरेदी कर्ज योजना

नवीन फ्लॅट खरेदीसाठी/घर बांधणीसाठी/जुना फ्लॅट/घर खरेदीसाठी
तुमच्या सध्याच्या घराच्या दुरूस्तीसाठी/विस्तारासाठी
एन. ए. प्लॉट खरेदी व बांधकाम दोन्हीसाठी

प्रति लाखास
₹ १२००/-

मुदत
१५ वर्षे

कमाल मर्यादा
₹. ५० लाख

**पात्रता :**
व्यावसायिक – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट
पगारदार – निव्वळ मासिक पगाराच्या ६० पट
शेती – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट

**उत्पन्न कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षाची आयकर विवरण पत्रके
पगारदार – पगारपत्रक, हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे, बँक स्टेटमेंट

**आवश्यक कागदपत्रे :**
मिळकतीशी संबंधित अद्ययावत कागदपत्रे,
७/१२ उतारा, सिटी सर्वे उतारा,
मूल्यांकन अहवाल

**कायदेशी बाबी :**
शोध अहवाल, कायदेशीर मत
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जामीनदार
आर्थिक कागदपत्रांसहीत.



## गाडी कोणतीही घ्या... अर्थसहाय्य आम्ही करू...!

दुचाकी / चारचाकी वाहन खरेदीसाठी

# सुहाना सफर कर्ज योजना

प्रति लाखास
₹ २२२५/-

२४ तासात कर्ज उपलब्ध

100 %
पर्यंत कर्ज उपलब्ध

**आवश्यक कागदपत्रे :**
गाडीचे कोटेशन, मुल्यांकन रिपोर्ट

**आर्थिक कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षाची आयकर पत्रके
पगारदार – पगारपत्रक हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जमीनदार.

